**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.10 No.5** **May– June 2023**

# भारतीय शेतकरी आणि स्वामीनाथन आयोग

**प्रो. हितेंद्र रामराव आहेर**
कर्म. रामरावजी आहेर महाविद्यालय देवळा, जि.नाशिक
**Corresponding Author- प्रो. हितेंद्र रामराव आहेर**
**Email**- jaykarmaveer@gmail.com.
**DOI- 10.5281/zenodo.8120011**

**प्रस्तावनाः**

कृषीप्रधान भारताची ५० ते ५५ टक्के लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे. एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा दिवसेंदिवस घटत असून तो आज १६ टक्क्यांपर्यंत आहे. शेतीतल्या विविध प्रयोगांनी एकूण उत्पन्नात वाढ झालेली दिसत असली तरी रोजगार निर्मितीचा प्रश्न गंभीर बनला आहे. शेतमालाचे उत्पादन वाढविणे म्हणजे विकास आणि उत्पन्न किती टनांनी वाढले याची मोजदाद म्हणजेच शेतीचा विकास झाला असे काहीसे चित्र आज दिसते आहे. परंतु देशाच्या अन्नधान्याची गरज पूर्ण करणारा बळीराजाला शेतीतून निव्वळ उत्पन्न किती मिळाले? याचा विचार 'कृषी विकास' या संकल्पनेत येत नाही. जेव्हा जेव्हा शेतीतील अडचणी, शेतकऱ्यांच्या अडचणी हे विषय चर्चेत येतात, तेव्हा हमखास होणारा एक उल्लेख म्हणजे “स्वामिनाथन आयोग”. ह्या आयोगात नेमक्या कोणत्या गोष्टी आहेत? त्यांचं महत्व काय? आज पर्यंत त्यावर काय कामगिरी झाली आहे, असे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यांचा परामर्श या लेखातून घेतला आहे.

**भारतीय शेतीः स्वातंत्र्यपूर्व काळ-**

मानवाच्या स्थिर जीवनाची खरी सुरुवात शेतीच्या शोधापासून झाली आहे. केवळ अनुभव व निरिक्षणातून मानवाने अन्ननिर्मितीचे तंत्र शोधून काढले. पोषणमूल्य असलेल्या बियाण्यातूनच पेरणीसाठी बियाणे उपलब्ध केले. पशुपालनाचा शोध लागला. शेतीमुळे मानवी जीवनात आमुलाग्र बदल झाले. मातीचे स्वास्थ्य टिकवून ठेवणं, पिकांची जैवविविधता आणि स्थानिक परिस्थितीशी सुसंगत अशा बियाण्यांचा वापर हे भारतीय शेतीचे तीन मुख्य आधार होते. पाणी, माती, जंगले यांचे जतन केले जाई. ग्रामवनाची व गावतळयांची संकल्पना शेतकरी सामूहिक पध्दतीने राबवित शेतीतील आर्द्रता वाढविणे जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याच्या पध्दती, कमी - जास्त पावसात घ्यावयाच्या पिकांची माहिती शेतकऱ्यांना होती. गावपातळीवर धान्य साठवणूकीची व्यवस्था असल्यामुळे कितीही मोठा दुष्काळ पडला तरी मनुष्यहानी होत नव्हती. ब्रिटिश राजवटीपूर्वी शेतीत काय पिकवायचे याचे स्वातंत्र्य शेतकऱ्यांना होते. ब्रिटिशांनी मात्र शेतकऱ्यांच्या स्वायत्ततेवर बंधने आणली. जमिनीवर ५० टक्क्यापेक्षाही जास्त शेतसारा लावला. अन्नधान्याच्या पिकांऐवजी कापूस, ऊस, तेलबीया अशा नगदी पिकांची सक्ती केली जाऊ लागली. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान तर झालेच पण अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. सावकार व जमीनदारांचा उदय झाला आणि शेतकऱ्यांची लूट सुरु झाली. पीक येवो अथवा न येवो शेतसारा वसूल केला जात होता. शेतकरी कर्जबाजारी होत गेला. त्यांच्या जमिनी सावकाराच्या हातात गेल्या. शेतकऱ्यांची विपन्नावस्था सुरु झाली. आणि गरिबीत प्रचंड वाढ झाली. शेतकऱ्यांना परकीयांच्या गुलामीतून बाहेर काढण्यासाठी अनेक सत्याग्रह झाले असले तरी स्वकीयांच्या गुलामीतून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठी कोणते आणि कसे सत्याग्रह करावेत हा प्रश्न आजही शेतकऱ्यांपुढे आहे.

**भारतीय शेती स्वातंत्र्योत्तर काळः**

स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशापुढे अन्नधान्याची समस्या होती. दुष्काळांचीही त्यात भर पडली नियोजनाचा अवलंब करून कृषी विकासाला प्रोत्साहन दिले गेले. १९६६ च्या हरितक्रांतीने शेती तंत्र बदलले. अधिक उत्पादन देणारी बियाणे, त्यांचे संकरित वाण शोधले गेले. रासायनिक खतांचा वापर वाढला. सुरुवातीला गहू आणि तांदूळ या दोन महत्त्वाच्या पिकांपासूनच हरितक्रांतीची सुरुवात झाली. उत्पादनात वाढ झाली, निर्यात वाढली हे हरितक्रांतीचे होय. हरितक्रांतीला आता ५७ वर्षे पूर्ण झालीत. २०२३ मध्ये देशाच्या स्वातंत्र्याचा ७६ वा वर्धापन दिन साजरा होईल, तोपर्यंत शेतकन्यांचे उत्पन्न दुप्पट करुन देण्याची सरकारने घोषणा केली आहे. जमीन वाढत तर नाहीच मात्र लागवडीखालच्या जमिनीचे प्रमाणही घटत आहे. त्यातच आधुनिक बियाण्यांना सरकार अनुमती देत नाही आणि तरीही सरकारने शेतकऱ्यांना दुप्पट उत्पन्नाचे आमिष

दाखविले आहे. यासाठीही अनेक अभ्यासगट, मंत्रीगट, कार्यसमित्या नेमल्यात. अनेक अहवाल येतील, शेकडो हजारो शिफारशी होतील, पण अंमलबजावणीचे काय? आजचा शेतकरी आधुनिक शेतीचा गुलाम आहे. अन्नधान्याचे उत्पादन जरी वाढले असले तरी देशापुढे पोषणमूल्यांचे मोठे आव्हान उभे आहे. कुपोषणाचा प्रश्न भेडसावत आहे. सुधारित तंत्रज्ञानामुळे पिकांना अधिक रासायनिक खते, कीटकनाशकांचा वापर झाल्याने जमिनीतील इतर पोषकद्रव्यांची कमतरता निर्माण झाली आहे. सेंद्रिय खतांच्या अल्प वापरामुळे जमिनीचे आरोग्य धोक्यात आले आहे. शेतीतला भांडवली खर्च दिवसेंदिवस वाढत गेला मात्र उत्पादन वाढले नाही. शेतमालाचे भाव वाढले नाहीत. शेतकरी अन्नधान्य पिकाऐवजी काही प्रमाणात नगदी पिकाकडे वळले. बहुविध पीक पध्दतीत उत्पन्नात जी सुरक्षितता होती ती कमी झाली. शेतीतील नफा कमी झाला. शेतकरी कर्जबाजारी झाले. वेळेवर कर्जफेड न झाल्याने आत्महत्या करायला प्रवृत्त होऊ लागले. रसायनांच्या रिक्त वापरामुळे जमिनीची धूप झाल्यामुळे पाण्याची पातळी खोल गेल्याने जमिनीच्या सुपिकतेत घट झाल्याने जो पंजाब प्रांत तंत्रज्ञानाच्या वापरात आणि उत्पादन वाढीत आघाडीवर होता तेथे पिण्याचे पाणीसुध्दा दूषित झाले आहे. गावागावात कॅन्सरसारखा आजार बळावतो आहे. थोडक्यात तंत्रज्ञानाने शेतकऱ्यांचे भले झाले का? हा खरा प्रश्न आहे. आज संसदेमध्ये निम्म्याहून अधिक खासदार स्वतःला शेतकरीपुत्र असल्याचे सांगतात. पण शेतकऱ्यांसाठी कायदेकानू तयार करण्यासाठी त्यांच्या पुढाकार नसतो. सरकारकडे उद्योगांना द्यायला पैसा आहे. मात्र शेतकऱ्यांना सबुरीचा सल्ला दिला जातो. शेतकरीपुत्र असणारे खासदार व मंत्री आंतरराष्ट्रीय बाजारात शेतकऱ्यांचे हित मोलभावाने विकत आहेत, पण त्यांना विचारणारं कोणी नाही, ही अमृतमहोत्सवी स्वातंत्र्याची खरी शोकांतिका आहे.

**काय आहे स्वामीनाथन आयोगः**

कोणीही उठतो आणि म्हणतो, 'स्वामिनाथन आयोग लागू करा.' "स्वामिनाथन आयोग लागू करा, असं आमच्या गावाकडे भाषणं ठोकताना पुढारी सांगतात, लोकसुद्धा टाळया वाजवतात. पण, त्या स्वामिनाथन साहेबांनी त्यात काय म्हटलंय हे कुणाला माहितेय?" असं अनेक कथित शेतकरी नेते खासगीत सांगतात. ही स्थिती जशी महाराष्ट्रात, तशीच कदाचित तामिळनाडूत, मध्य प्रदेशात, हरियाणात, पश्चिम बंगालात. सत्तेची ओढ स्वस्थ बसू देत नसल्याने विरोधी बाकांना कंटाळलेले विरोधी पक्षही मग या नवनेत्यांची री ओढत स्वामिनाथन आयोगाचा जप करताना दिसतात.

भारताच्या सतत वाढणाऱ्या लोकसंख्येला पुरविता येईल एवढे अन्न निर्माण करण्याचा महत्वाचा प्रश्न आहे. शेतीचे प्रश्न जेवढे नैसर्गिक आहेत. तेवळेच ते मानवनिर्मितही आहेत. सततचा दुष्काळ आणि आर्थिक अस्थैर्य यामूळे अनेकांनी शेती करणंच बंद केले आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीऐवजी योग्य आणि कालसुसंगत हमीभाव मिळणे गरजेचे आहे, त्याशिवाय शेती किफायतशीर ठरणार नाही. शेती व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी हरितक्रांतीचे प्रणेते डॉ. एस.एस.स्वामीनाथन या प्रचंड अभ्यासू व्यक्तीच्या अध्यक्षतेखाली १८ नोव्हेंबर २००४ रोजी राष्ट्रीय शेतकरी आयोगाची स्थापना करण्यात आली.. यास राष्ट्रीय शेतकरी आयोग (नॅशनल कमिशन ऑन फार्मर्स) असेही म्हणतात. या आयोगाचे राम बदन सिंग व वाय. सी. नंदा हे पूर्णवेळ सदस्य आणि आर. एल. पितळे, जगदीश प्रधान, चंदा निमकर, अतुल कुमार अंजन हे अर्धवेळ सदस्य आणि अतुल सिन्हा हे सदस्य सचिव होते.

अन्नसुरक्षा आणि पोषण याबाबत नियोजन करणे, उत्पादन व नफ्याचे प्रमाण या निकषांवर शेतीची व्यवस्था करणे, शेती पतपुरवठ्यात वाढ करणे, कोरडवाहू शेतीसाठीच्या योजना राबविणे, शेतमालाची गुणवत्ता व किंमत यांची जागतिक बाजाराशी सांगड घालणे, पर्यावरण व जीवसंस्थांचे जतन व संवर्धन आणि किंमतीतील चढउतारांचा शेतीवर कमीतकमी परिणाम होईल अशी यंत्रणा उभी करणे ही या कृषक आयोगाची उद्दिष्टे होती. सिलिंगप्रमाणे अतिरिक्त आणि उपजाऊ नसलेल्या जमिनीचे फेरवाटप करणे, बागायती जमिनीचा आणि वनक्षेत्राचा वापर उद्योगांसाठी करण्यास प्रतिबंध करणे. गवताळ जमिनीवर चराईचे अधिकार आणि वनसंपत्ती अधिकार आदिवासी आणि पशुपालकांना देणे, पर्यावरण आणि खनिज संपत्ती यांच्या अभ्यासातून जमिनीच्या योग्य वापरासाठी केंद्रीय समिती निर्माण करणे. शेती खरेदी करताना कोण कशासाठी आणि किती जमीन खरेदी करतंय याचे नियमनासाठी यंत्रणा उभारणे, याविषयी स्वामिनाथन आयोगाने आपले चार अहवाल अनुक्रमे डिसेंबर २००४, ऑगस्ट २००५, डिसेंबर २००५ आणि एप्रिल २००६ मध्ये सादर केले. पाचवा आणि अंतिम अहवाल ४ ऑक्टोबर २००६ रोजी सादर केला. अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या दृष्टीकोनात विचाराधीन असलेले 'जलद आणि अधिक समावेशक वृद्धी'चे ध्येय साध्य करण्यासाठीच्या सूचनांचा समावेश या अहवालात आहे.

स्वामिनाथन आयोगासमोर पुढील संदर्भ मुद्दे ठेवण्यात आले होते. त्यावर आयोगाने सूचना करणे अपेक्षित होते.

1) देशातील अन्न व पोषण सुरक्षेसाठी सर्वसमावेशक व्युहरचना तयार करणे.
2) देशातील प्रमुख शेती व्यवस्थेची उत्पादकता, लाभप्रदता, स्थैर्य व शाश्वतता वाढविण्यासाठी पद्धती सुचविणे.
3) ग्रामीण भागांत उत्पन्न व रोजगार वाढविण्यासाठी उपाय सुचविणे.
4) शिक्षित युवक शेतीकडे आकर्षित होण्यासाठी व शेतीत टिकण्यासाठी उपाय सुचविणे.

5) कृषी संशोधनातील गुंतवणूक वाढविण्यासाठी व शेतकऱ्यांकडे ग्रामीण कर्जपुरवठ्याचा प्रवाह वाढविण्यासाठी सर्वसमावेशक धोरणात्मक सुधारणा सुचविणे.
6) कोरडवाहू शेतीसाठी विशेष कार्यक्रम तयार करणे.
7) शेतीतील उत्पादनांची गुणवत्ता आणि खर्च स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी उपाय सुचविणे.
8) महिलांच्या पत, ज्ञान, कौशल्य, तंत्रज्ञान व विपणन सबलीकरणासाठीच्या उपायांची शिफारस करणे.
9) स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडून आलेल्या महिला व पुरुष यांना शाश्वत शेतीसाठी पर्यावरणीय पाया संवर्धन व सुधारणांसाठी सक्षम करण्यास पद्धती सुचविणे.

सर्व शेतीमालाला सर्वसमावेशक, समग्र उत्पादन खर्चाच्या दीडपट किमान आधारभूत किंमत द्यावी, अपूर्ण सिंचनप्रकल्प युद्धपातळीवर पूर्ण केले जावेत. शेतीला उद्योग म्हणून पाहिले पहिजे, शेती कर्ज चार टक्क्यांवर नको, चक्रवाढ व्याज लावू नये, नैसर्गिक आपत्तीच्या वेळी शेतकऱ्यांवर असलेले कर्ज तातडीने माफ केले जावे, प्रत्येक पिकासाठी विमा मिळाला पाहिजे, पिकविमा योजनेत केवळ सरकारी कंपन्यांना स्थान असावे, शासकीय जमिनींवर चारापिके घेऊन चारा उपलब्ध करून द्यावा, खाद्यतेल आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी गळीत धान्य पिकांसाठी प्रकल्प तयार केले जावेत असे अनेक मुद्दे आयोगाने सांगितले आहेत.

किसान आंदोलनाच्या दरम्यान केंद्रीय कृषिमंत्री सांगत होते की, स्वामिनाथन आयोगाच्या २०० शिफारशींपैकी १९९ पूर्ण केल्या. सरकारकडून अशा प्रकारे वारंवार खोटे बोलण्याचा व शेतकऱ्यांना धोका देण्याचा प्रकार होत आहे. बड्या उद्योगपतींची थकित कर्जे माफ केली जातात, पण शेतकऱ्यांच्या बाबतीत दुजाभाव केला जातो. अल्पभूधारक शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा देण्यासाठी ६ लाख कोटी रुपये लागतील. पैसे बुडवून परदेशात पळून गेलेल्या बड्या उद्योगपतींच्या बुडीत कर्जापेक्षा ही रक्कम कमीच आहे. मोठ्या शेतकऱ्यांच्या संदर्भात एक वेळ समझोता (ओटीएस) करून हप्ते बांधून दिले जावेत. यातून ग्रामीण भागातील अनेक समस्या सुटतील. शेतकरी आत्महत्या नक्कीच कमी होतील.

**आयोगाने सुचविलेल्या उपाययोजना :**

शेतीसाठी पुरेशा आणि कायमस्वरुपी पाण्याची व्यवस्था करणे. पावसाच्या पाण्याचा जास्तीत जास्त वापर, जलस्त्रोत पुनर्भरणाची सक्ती करणे. सिंचनासाठी भूजलपातळीत वाढ करण्यासाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद करणे. शेतकऱ्यांना माफक दरात आरोग्य विमा उपलब्ध करुन देणे आणि प्राथमिक आरोग्य केंद्र सक्षम करणे आवश्यक माहिती शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होण्यासाठी गावागावात माहिती केंद्रे स्थापन करणे. सुक्ष्मवित्तपुरवठयाच्या योजना सक्षम कराव्यात आणि त्याचा आवाका तंत्रज्ञान, बाजारपेठ आणि व्यवस्थापन क्षेत्रात वाढवावा. उच्च प्रतिच्या बियांणांचा आणि इतर पूरक बाबींचा योग्य वेळेला योग्य ठिकाणी आणि परवडणाऱ्या दरात पुरवठा करावा. शेतमालाच्या आयातीवर आयातशुल्क लावण्यासाठी त्वरीत उपाययोजना कराव्यात. आत्महत्या करण्याची प्रवृत्ती किंवा लक्षणं इतर माणसांना समजण्यासाठी, उपाययोजना करण्यासाठी जनजागृती मोहीम राबवावी. शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी सिंचन, पाण्याचा निचरा, जमिनीचा पोत आणि गुणवत्ता सुधारणे, भूजलपातळी वाढविणे, जलस्त्रोत रक्षण, संशोधन आणि शेतमालाच्या वाहतुकीसाठी ग्रामीण रस्ते या शेतीशी निगडीत पायाभूत सुविधांमध्ये जास्तीत जास्त गुंतवणूक करणे. मातीची गुणवत्ता टिकून रहाण्यासाठी माती परीक्षण प्रयोगशाळांची उभारणी करून सूक्ष्म पोषण द्रव्यांची तपासणी करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी सुविधा निर्माण करणे इ.

**स्वामीनाथन आयोग प्रमुख निष्कर्ष, शिफारसी आणि वास्तव:**

स्वामीनाथन आयोगाने किमान आधारभूत किंमतीच्या पध्दतीत सुधारणा करून शेतकरना पीक उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा मिळेल इतका हमीभाव, आधारभूत किंमत लागू करण्याची पध्दत सुधारून गहू आणि इतर अन्नधान्य वगळता इतर पिकांना आधारभूत किंमत मिळण्याची व्यवस्था करावी. बाजाराच्या चढ उतारापासून शेतकऱ्यांचे संरक्षण व्हावे म्हणून 'मूल्य स्थिरता निधीची' स्थापना करावी. आंतरराष्ट्रीय बाजारातील किमतीच्या दुष्परिणामांपासून संरक्षण करण्यासाठी आयात होणाऱ्या शेतमालाला कर लावावा. दुष्काळ आणि इतर आपत्तीपासून बचावासाठी 'कृषी आपत्काल निधीची' स्थापना करावी, कृषी कर्जपुरवठा प्रणालीचा विस्तार करावा. पीक कर्जावरील व्याजदर ४ टक्के असावा, संस्थाबाह्य कर्जाचे नियमन करावे, महिलांना किसान क्रेडिट कार्ड, हलाखीची स्थिती असलेल्या क्षेत्रामध्ये नैसर्गिक संकटाच्या काळी पूर्वपरिस्थिती येईपर्यंत गैरसंस्थात्मक कर्जासह सर्व कर्जाची वसुली स्थगित करून त्यावरील व्याज माफ करावे, कमी हप्त्यांचा पीकविमा, सामाजिक सुरक्षेचे जाळे, वृद्ध शेतकऱ्यांना स्वास्थ्य विम्याची तरतूद, वाजवी दरात बियाणे व यंत्रसामग्री द्यावी शेतीला सातत्याने सिंचन आणि वीजपुरवठा करावा, पणन व्यवस्थेत सुधारणा करावी या प्रमुख शिफारशी केल्या आहेत.

याशिवाय स्वामिनाथन आयोगापुढे ठेवलेल्या समस्या किंवा बाबींसंबंधी आयोगाने केलेल्या अभ्यासातून निघालेले निष्कर्ष व केलेल्या महत्वपूर्ण शिफारसी-

**अन्न सुरक्षा :** देशातील घटती दरडोई अन्नधान्य उपलब्धता आणि त्याचे असमान वाटप यांचे ग्रामीण व शहरी भागातील अन्न सुरक्षेवर गंभीर परिणाम झालेले आहेत.

तसेच देशात दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण अद्यापही मोठे आहे. अन्न सुरक्षेच्या बाबतीत या आयोगाने शिफारसी केलेल्या आहेत.

**शेतकरी आत्महत्यास प्रतिबंध:** स्वामिनाथन आयोगाच्या अहवालात ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची दैन्यावस्था मांडून शेतकरी आत्महत्यांची समस्या प्राधान्याने सोडविण्याची गरज स्पष्ट केली.

**उत्पन्न व रोजगार:** शेतीची उत्पादकता धारणक्षेत्राशिवाय उत्पादकतेची पातळी प्रामुख्याने शेतकऱ्याचे उत्पन्न निश्चित करते. भारतीय शेतीची उत्पादकता प्रमुख पीक उत्पादक देशांपेक्षा फारच कमी आहे. शेतीच्या उत्पादकतेत वेगाने वृद्धी घडवून आणण्यासाठी या आयोगाने शिफारसी केल्या आहेत.

**जमीन सुधारणा:** पिके व पशुधन या दोन्हींना जमीन उपलब्ध होण्याची मूलभूत समस्या सोडविण्यासाठी जमीन सुधारणा आवश्यक आहेत. जमीन धारणेची असमानता भूमी मालकीमध्ये दिसून येते.

**सिंचन:** देशात सिंचनाचे प्रमाण कमी असून स्थूल पिकांखालील क्षेत्रांपैकी ६० टक्के क्षेत्र पावसावर अवलंबून आहे. सिंचनाबाबत या आयोगाने शिफारसी केलेल्या आहेत.

**पत आणि विमा:** औपचारिक पतव्यवस्था खरोखरच गरीब व गरजू लोकांपर्यंत पोहचण्यासाठी या व्यवस्थेची व्याप्ती वाढवावी. सरकारच्या सहकार्याने पीक कर्जावरील व्याजाचा दर सरळ ४ टक्क्यांपर्यंत कमी करावा याबाबत काही शिफारसी आहेत.

**शेतकऱ्यांची स्पर्धात्मकता:** अतिशय लहान भूधारण क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांची स्पर्धात्मकता वाढविणे आवश्यक आहे. विक्रीयोग्य वाढावा वाढविण्यासाठी उत्पादकता सुधारणा निश्चित आणि किफायतशीर विपणन संधींना जोडणे आवश्यक आहे. याबाबतीत आयोगाने उपाय सुचविले आहेत.

**रोजगार :** भारतात हळूहळू मनुष्यबळाच्या बाबतीत रचनात्मक बदल घडून येत आहेत; परंतु अजूनही ग्रामीण भागात शेती फार मोठ्या प्रमाणात रोजगार पुरविते. उत्पादक रोजगार संधी निर्माण करणे आणि अनेक क्षेत्रांतील रोजगाराची गुणवत्ता सुधारणे (उदा. उत्पादकतेतील सुधारणेच्या आधारे वास्तव वेतन वाढते) अशा दोन गोष्टी साध्य करण्याच्या दृष्टीने भारतातील एकूणच रोजगार व्यूहरचना असावी. त्यासाठीचे उपाय सुचविले आहेत.

**जैव स्रोत :** भारतातील ग्रामीण लोक त्यांच्या पोषण आणि आजीवन सुरक्षेसाठी विविध जैव स्रोतांवर अवलंबून असतात. याबाबतीत आयोगाने शिफारसी केलेल्या आहेत

स्वामीनाथन आयोगाच्या ज्या शिफारशी आहेत. त्यातील बहुतांश १०० वर्षापूर्वी राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात राबविल्या होत्या. १९०७ मध्ये राधानगरीसारखे मोठे धरण बांधण्याचे काम सुरु केले. शेतकऱ्यांना बी- बियाणे, शेती अवजारे, बैल खरेदीसाठी कर्जपुरवठा केला. स्व. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, वसंतराव नाईक, शरदचंद्रजी पवार यांच्या शेती धोरणावर शाहू महाराजांच्या कृषी धोरणाचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. डॉ. स्वामीनाथन यांनी केलेल्या काही शिफारशीवर अंमलबजाणी करण्यात आल्याचे सांगितले जाते. त्यात, शेताचे खर्च वजा जाऊन उत्पन्न सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे असावे या शिफारशीच्या बाबत सरकारी कर्मचारी हा नोकर आहे. त्याच्या कामाचे स्वरुप मिळणाच्या सुविधा, हक्क व जबाबदाऱ्या पूर्णतः वेगवेगळया आहेत. कर्मचारी संघटित आहेत. शेतकरी हा स्वतः मालक आहे पण तो संघटित नाही. त्याचे जीवन बऱ्यापैकी निसर्गावर व अनियंत्रित बाजारपेठेवर अवलंबून आहे. त्यामुळे ही शिफारस व्यवहार्य वाटत नाही. शेतमालाचा हमीभाव उत्पादन खर्च वगळता ५० टक्के नफा धरुन असावा ही शिफारस योग्य असली तरी सुध्दा उत्पादन खर्च दर हेक्टरी उत्पादन, सींचन सुविधा, मजुरी, वापरलेले तंत्रज्ञान यावर ठरतो. हरियाणा, पंजाब व महाराष्ट्राची तुलना केल्यास महाराष्ट्रातील हेक्टरी उत्पादन खूप कमी व खर्च जास्त आहे. कृषी आपत्काल निधीची कार्यवाही करताना मोठा निधी लागणार आहे. बी - बियाणे परवडणाऱ्या दरात उपलब्ध करून द्यावीत म्हणजे परवडणारा दर कसा ठरविणार. तरीही सवलतीच्या दरात ही सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

**स्वामीनाथन आयोग व कृषी विकासः**

अमेरिकेसारख्या विकसित देशात केवळ २८ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून असतानाही शेतकऱ्यांना योग्य तो हमीभाव व लाईफ सपोर्ट सिस्टीम अमेरिकेने उपलब्ध करुन दिल्याने तेथील शेतकरी सधन बनला आहे. भारतीय शेती प्रयोगशाळा बनायला हवी, रोजगार निर्माण होण्याच्या दृष्टीने अहवालाची मांडणी करण्यात आली आहे. भारतीय शेतीपुढे सततचे काही प्रश्न आहेत. त्यातील शेतमालाच्या किंमती, किंमत धोरण आणि उत्पादनाशी संबंधित प्रश्नांचा विचार करता, सध्या शेतमाल विकताना शेतकऱ्यांवर अनेक बंधने आहेत. उदा. निर्यात बंदी, व्यापाऱ्यांनी साठा करण्यावर बंधने, फॉरवर्ड मार्केटवर बंदी यामुळे शेतकऱ्याचा माल वेळेवर विकत घेतला जात नाही. सरकार घेऊ शकत नाही, किंमती कोसळतात. शेतकरी भीकेस लागतो, आत्महत्या करतो. यासाठी शेतमाल विक्रीवरील बंधने रद्द झाली पाहिजेत. सर्व देश म्हणजे एकच बाजार या दृष्टीने विचार व्हायला हवा. निर्यातीसाठी परवानगी द्यावी. बीज व पाण्याचा काटकसरीने वापर केल्यामुळे शेतकऱ्यांना कितपत फायदा झाला याचाही अभ्यास झाला पाहिजे. शेतीत अत्यल्प संशोधन झाले आहे किंवा संशोधनाकडे दुर्लक्ष झाल्याने आपण खूप मागे पडलो आहोत. भारतीय शेतीची दरहेक्टरी उत्पादकता इतर देशांच्या मानाने खूपच कमी आहे. उदरनिर्वाहासाठी शेती करणाऱ्यांची संख्या कमी करण्याच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर १०० वर्षांपूर्वी म्हणतात की,

औद्योगिकीकरण हाच शेती विकासाचा प्रभावी मार्ग आहे. बिगरशेती क्षेत्रामध्ये रोजगारनिर्मिती करून शेतीवरील गर्दी कमी केल्याशिवाय भारतीय शेती आणि शेतकऱ्यांना तरणोपाय नाही.

स्वामीनाथन आयोग सतत चर्चेत असतो. आयोगाच्या काही शिफारशी शेतीस पूरक, मारक व अंमलात आणता न येणाऱ्या आहेत. यातील राष्ट्रीय भूमी पीक वापर सल्लागार मंडळ, सामाजिक अन्नधान्य पेढया, अन्न हमी कायदा, गहू तांदूळ याशिवाय इतर पिकांनाही हमीभाव लावणे म्हणजे सरकारी एकाधिकारास चालना देणे, शेतमाल भाव स्थिरीकरण निधी, बचतगट, शेतकऱ्यांना सरकारी नोकरांसारखे वेतन मिळवून देणे हे मुद्दे अंमलात आणता येणे अशक्य आहेत. अन्नसुरक्षा व शेतीला मजूर मिळणे कमी होईल याचा विचार झालेला नाही. यामुळे भ्रष्ट व अकार्यक्षम अन्न महामंडळ वाढविण्याचे काम होईल. रोजगार हमी आणि स्वस्त धान्य योजनेमुळे आज शेतमालाला जास्त किंमत देण्याची मागणी झाल्यावर सरकारकडून आर्थिक बोजा निर्माण होतो असे सांगितले जाते. शेतीमध्ये पैसा मिळत नाही, शेतीमालाला किंमत नाही मग शेतकऱ्याने शेती करायची तरी का? शेतीमध्ये किती उत्पादन झाले यापेक्षा शेतकऱ्यांचे उत्पन्न किती वाढले यावरच शेतीचा किती विकास झाला हे ठरविले पाहिजे. शेतकरी समाधानी झाला तरंच देशाचा विकास होईल. केवळ उद्योजकांचे भले करुन विकास होणार नाही. उद्योगधार्जीन्या धोरणांत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून देणे योग्य होणार नाही. शेतकऱ्यांच्या विकासासाठी शेतीची धोरणे बदलली पाहिजेत तरंच परिस्थिती नियंत्रणात येऊ शकते अन्यथा चांगले पिक येऊनही हात काही लागत नाही. हे अनुभवल्यावर शेतीतून नाईलाजाने बाहेर पडणाऱ्या निराश तरुणांचे प्रमाण अधिक वेगाने वाढणार आहे आणि देशापुढील हे सर्वात मोठ संकट असणार आहे.

स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी स्वीकारुन तप उलटले तरी केंद्र सरकार वा कुठल्याही राज्याने त्यांची अंमलबजावणी केलेली नाही. यासाठी निधी कुठून आणायचा, हमीभाव कसा द्यायचा, हमीभावाने खरेदी केलेला शेतमाल कसा विकायचा. त्यासाठी तरतूदी नाहीत अशी कारणे सांगून चालढकल केली. या त्रुटीवर मार्ग काढण्याऐवजी कर्जमाफीच्या झटपट लोकप्रिय आणि सत्ता देणाऱ्या योजनांचा आधार घेतला जात आहे. भारतात आर्थिक उदारीकरणाला सुरुवात होऊन ३३ वर्षांचा काळ लोटला आहे. शेतकरी वगळता सर्वच समाजघटकांना आणि व्यवसायांना उदारीकरणाचा लाभ झाला. शेतकरी मात्र लोकनियुक्त सरकारांचा गुलाम आहे. म्हणायला देशात लोकशाही आहे. बहुमताचे सरकार आहे, शेतकरीही बहुमतातच आहेत, मात्र लोकशाहीत शेतकऱ्यांची अवस्था एका नोकरासारखी आहे. त्याला तलाठयासमोर हात जोडावे लागतात, बँक अधिकाऱ्याच्या खोलीबाहेर भिकाऱ्यासारखे ताटकळत बसावे लागते. तहसील कार्यालयात कामांसाठी टाचा घासत फिरावे लागते. म्हणजेच आज शेतकरी स्वतंत्र भारताचा नागरिक नाही तर राजाच्या दयेवर चालणाऱ्या प्रजेच्याच अवस्थेत आहे. आजही जीवनावश्यक वस्तू कायदा लागू आहे. शेतीच्या कोणत्याही व्यापारात सरकार केव्हाही निर्बंध घालू शकते. निर्यातीवर बंदी, जादा दराने आयात, शेतमाल साठवणूक व विक्रीवर बंदी, बाजारावर बंधने, लेव्हीची पध्दती हे सारे सुरुच आहे. प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे उत्पादन खर्चापेक्षा कमी भाव मिळूनही शेतकरी जगतो कसा? शरद जोशी म्हणायचे शेतकरी स्वतःचे भांडवल खाऊनच जगत असतो. आपली जमीन, जनावरे तो कणाकणाने खात असतो. कुठल्याही आर्थिक अडचणीत त्याला कर्ज काढल्याशिवाय पर्याय नसतो. शेती उत्पादनखर्च भरून निघत नसल्याने फायदा होईल कर्ज फिटेल हे केवळ स्वप्न ठरते. शेतकरी कर्जात जगतो व कर्जात मरतो.

**समारोप:**

स्वामिनाथन आयोगाने शेतकरी व शेतीविषयक समस्यांचा सविस्तर अभ्यास करून त्या सोडविण्यासाठी शिफारसी केलेल्या आहेत. या सर्व शिफारसी शासनाने स्वीकारल्या, तर या समस्यांची तीव्रता कमी होण्यास मदत होईल; मात्र यांपैकी अनेक शिफारसी शासनाने स्वीकारण्यासाठी शासनास मोठ्या प्रमाणात प्रशासकीय व व्यवस्थापकीय यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. गेल्या चार वर्षांत झालेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनात स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीचा वापर दुधारी अस्त्रासारखा करण्यात आला. आता खुद्द, या आयोगाचे कर्तेधर्ते स्वामिनाथन यांनीच मोदी सरकारने गेल्या चार वर्षांत शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि जीवनमान उंचावण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन ते राबवले असल्याचे प्रशस्तिपत्रक देऊ केलं आहे. आत्ता बोला...

**संदर्भः**


1) स्वामीनाथन आयोग- अहवाल -२००४
2) बिझनेस लाईन फेब्रुवारी १६, २००७
3) आर्थिक सर्वेक्षण २०१४.
4) इंडियन एक्सप्रेस, नोव्हे, ४, २०१५
5) अष्टेकर शाम स्वामीनाथन अहवाल आणि रालोआ, म.टा., ऑक्टो.१३, २०१६
6) भारतीय शेती : हरवलेली वाट आणि शाश्वत पध्दतीची गरज- विकासपीडिया.
7) काटे तारक, शाश्वत शेतीची वास्तवातील उत्पादकता. मिळून सान्याजणी.
8) पंढरी विलास, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशी आणि वास्तव, दै. प्रभात, पुणे, जुलै ६, २०१७.

9) कर्जमाफी नको, हमीभावच हवा, महाराष्ट्र टाईम्स, सप्टें. ९, २०१७
10) 10.दैनिक लोकसत्ता, संपादकीय सप्टेंबर २९, २०१७.
11) 11.यादव योगेंद्र, आजही शेतकरी गुलामच आहे. दै. लोकसत्ता. ऑक्टो.५, २०१७
12) 12.भदाणे जयवंत, शेतकऱ्यांची कर्जमाफी एक चिंतन, प्रिंटींग इरा, फेब्रुवारी,२०१८
13) 13.मुकुंद पिंगळे, अग्रोवन, मार्च २६, २०२३